राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ

विकास शाखा

"( सेंट्रल प्रोव्हिसेन्स शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३द्वारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ )"

विकास व सांखिकी विभाग

महात्मा ज्योतीबा फुले, शैक्षणिक परिसर, प्रशासकीय इमारत, अमरावती रोड, नागपूर दुरध्वणी क्र. (०७१२–२०४१०१४)

क्र. विकास/सां/वि.स.नि./२०१९–२०/ दिनांक : ६ /१/२०२०

प्रति,

प्राचार्य /विभागप्रमुख,

सर्व संलग्नीत/संचालीत महाविद्यालये व शैक्षणिक विभाग/संस्था.

विषय : विद्यार्थी सहाय्यता निधी २०१९–२०२०.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यांत येते की, विद्यापीठ शैक्षणिक विभाग/संचालीत व संलग्नित महाविद्यालयातील गरीब, गरजु पात्र विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहाय्यता निधीमधुन शिक्षण शुल्क/परिक्षा शुल्क/वसतीगृह भाडे व जेवणाचा खर्च/वैद्यकिय खर्च/पुस्तके खरेदी खर्च आदीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. याबाबतची नियमावली व विहित आवेदनपत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे..

आपणांस विनंती आहे की वरिल सहाय्यता निधीबाबतची अर्ज करण्याची कालमर्यादा ही १० जानेवारी, २०२० पर्यंत वाढविण्यात आली असून याबाबतची माहिती आपल्या स्थरावरून विद्यार्थ्यांना दयावी. **विद्यार्थ्यांचे विहित आवेदनपत्र आवश्यक कागदपत्रासह खालील स्वाक्षरीकृत अधिकारी यांचेकडे दि. १० जानेवारी, २०२० पर्यंतच्या कालावधीत विकास विभागाला विभाग प्रमुख/प्राचार्या मार्फत** आवेदनपत्रे सादर करण्याची अंतीम तारीख असून हया तारखेनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत केले जाणार नाहीत. तसेच आवेदनपत्र अपूर्ण भरले असल्यास किंवा आवेदनपत्रासह खालील आवश्यक प्रमाणपत्रे व आवेदनपत्रात नमुद केलेली कागदपत्रे न पाठविल्यास संबंधितांचे अर्ज अमान्य केले जातील याची कृपया नोंद घ्यावी. तसेच प्रशासकीय कार्य सुलभ व्हावे या द्रृष्टीकोणातून अर्ज दिलेल्या मुदतीत सरळ विकास विभाला सादर करून पोच घ्यावी. www.rtmnagpuruniversity.org. (Student corner) भरावयाचा अर्ज नमुणा व माहिती या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अडचणी उद्भवल्यास अशा विद्यार्थ्यांची अर्ज महाविद्यालयाने या सोबतच्या अर्ज नमुण्यात भरून सादर करावीत.

मा. कुलगुरू महोदयांचे आदेशान्वये

आपला,

(मनिष झोडपे )

उपकुलसचिव (विकास/सांख्यिकी)

महात्मा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

Vidyathi S.N.2019-2020 New